# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक ०३/०५/२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त</u>**

सोमवार दिनांक ०३-०५-२००४ रोजी मा.महापौर सौ.रूख्मिणी राधाकिसन शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ‘‘ प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ‘‘ येथे दुपारी ०१-१५ वाजता ‘‘ वंदेमातरम् ‘‘ या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त व संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री घोडेले नंदकुमार राधाकिसन
०३. स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.वाणी ठकूजी रामसिंग
०६. स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
०७. स.स.सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
०८. स.स.श्री.शे.ईलियास किरमाणी शे.उमर
०९. स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतू
१०. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
११. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
१२. स.स.श्री.राजू रामराव शिंदे
१३. स.स.श्री.कावडे साहेबराव राणूबा
१४. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१५. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
१६. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१७. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१८. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१९. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
२०. स.स.श्रीमती डॉ.आशा बिनवडे
२१. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२२. स.स.श्री.कुमावत अविनाश लक्ष्मण
२३. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२४. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२५. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२६. स.स.श्री.नजर हमीद अ.गफ़ुर
२७. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
२८. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
२९. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
३०. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
३१. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
३२. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३३. स.स.श्री.मगरे सुनिल यादवराव
३४. स.स.शिंदे किशोर रावसाहेब
३५. स.स.श्री.अ.कादर अ.हफ़ीज
३६. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव

३७. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसहाक
३८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३९. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
४०. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
४१. स.स.सौ.नुसरत बानो फ़िरोजखान
४२. स.स.श्री.तायडे पांडूरंग यशवंतराव
४३. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
४४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४५. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
४६. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४७. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४८. स.स.सौ.विमलताई भिकनसिंग राजपूत
४९. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
५०. स.स.श्री.अ.कदिर मौलाना सय्यद
५१. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
५२. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
५३. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५४. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
५५. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
५६. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
५७. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५८. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५९. स.स.श्री.स.सलिम स.युसूफ़
६०. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
६१. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
६२. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
६३. स.स.श्री.अजिजखान गणीखान
६४. स.स.श्री.अफसरखान यासीनखान
६५. स.स.सौ.सुलताना बेगम चाँद खॉ
६६. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६७. श्री.शे.मुनाफ़ शे.यासीन
६८. स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
६९. स.स.श्री.कैसर खान बद्रोद्दीन खान
७०. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
७१. स.स.सौ.बबिता सुभाष कागडा
७२. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
७३. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
७४. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
०२. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे
०३. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर
०४. सौ.सलमा बानो मीर मोहम्मद अली

**विषय क्र. ३०९/२ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, क्रांतीचौक ते पैठण गेट या मंजूर विकास योजना ३० मीटर (१०० फूट) रूंद रस्त्याबाबत डॉ.पसरीचा अतिरिक्त पोलिस महासंचालक (प्रशासन) महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवाल मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आला असता दिनांक १९.०९.२००३ च्या सर्वसाधारण सभेत डॉ.पसरीचा यांचा अहवाल रद्द केला (जे की डॉ.पसरीचा यांनी १०० फूट ऐवजी ७० फूट रूंद केल्यास काही हरकत नाही असा अहवाल दिला होता.)

सदर मंजूर झालेला ठराव मा.उच्च न्यायालयात सादर केला असता मा.उच्च न्यायालयाने प्रस्ताव पुन्हा सर्वसाधारण सभे समोर ठेवणे बाबत निर्देश दिले असता मा.आयुक्तांनी माहे ऑक्टोबर २००३ मधील सर्वसाधारण सभेसाठी प्रस्ताव सादर केला असता मा.महापौर यांनी '' या विषयी दिनांक १९.०९.२००३ च्या सर्वसाधारण सभेत निर्णय झालेला आहे. त्यामुळे हा विषय पुन्हा सर्वसाधारण सभे समोर ठेवण्याची आवश्यकता वाटत नाही.'' असे अभिप्राय नोंदविले हे पाहता मा.कोर्टाने खालील प्रमाणे मत व्यक्त केले, '' सदर निर्णय होऊ शकत नाही कारण ठराव पारित झाला असेल तर बहुमताने किंवा एक मताने हे मतदानास ठेवून ठराव घेण्यात आला असे दिसणे आवश्यक आहे. परंतू असे न होता एकदम निर्णय देवून सदर निर्णय हा ठराव असल्याचा मा.महापौरांनी निर्णय दिला'' सदरील बाब ही सभा कामकाजा संबंधीच्या प्रकरणातील तरतूदीशी विसंगत असल्याचे मा.कोर्टाने मत दिले आहे. तसेच मा.उच्च न्यायालयाने मा.आयुक्तांना एप्रिल २००४ च्या पहिल्या आठवड्यात सर्वसाधारण सभेची मिटींग आयोजित करून सदरील मिटींग मध्ये डॉ.पसरीचा यांचा अहवाल ठेवणे बाबत व त्यावर चर्चा करून मतदानासाठी ठेवणे बाबत निर्देशित केलेले होते.

तसेच सदरील विषयी महानगरपालिकेच्या बहुमताने किंवा एकमताने पारित होणाऱ्या ठरावा बाबत मा.उच्च न्यायालयात तातडीने लेखी कळविणे बाबत आदेशित केले होते.

त्याप्रमाणे दिनांक १०.०४.२००४ रोजी विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. उक्त सर्वसाधारण सभेत चर्चा होवून चर्चेनुसार सध्या लोकसभा निवडणूक सुरू आहे. त्यामुळे प्रकरणात वेळ वाढवून घेणे बाबत मा.उच्च न्यायालयास विनंती करावी असे सर्वानुमते प्रस्ताव मंजूर करण्यात आला. सदर मंजूर प्रस्ताव मा.उच्च न्यायालयास दिनांक १२.०४.२००४ रोजी सादर केले असता मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०३.०५.२००४ रोजी सर्वसाधारण सभा आयोजित करून सभेचा निर्णय दिनांक ०५.०५.२००४ रोजी सादर करणे बाबत मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत.

सबब डॉ.पसरीचा यांचा अहवाल सर्वसाधारण सभेसमोर चर्चेसाठी आणि त्या वरील विधीवत निर्णय घेण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.संजय शिरसाट : आजची सभा क्रांतीचौक येथील रस्ता रूंदीकरणाच्या संदर्भात आयोजित केलेली आहे. मी मा.सचिवांना विचारू इच्छितो की, विषयपत्रिकेमध्ये जे लिहिलेले आहे मा.उच्च न्यायालयाने आपल्याला जे आदेश दिलेले आहे त्या आदेशात त्यांनी मत नोंदविण्यास सांगीतलेले आहे. मत कोणत्या पध्दतीने नोंदवावयाचे आहे त्याबद्दल नगरसचिवांनी अगोदर सभागृहास माहिती द्यावी. मागे आपण मा.उच्च न्यायालयात सादर केलेले होते. मा. उच्चन्यायालयाने आपले मत ग्राह्य धरले नाही. त्यांनी असे सांगितले की, सर्व सदस्यांनी आपले मत नोंदवावे. मत नोंदवावे याचा अर्थ काय? याचा खुलासा सचिवांनी करावा.

मा.महापौर : या संदर्भात नगरसचिव यांनी माहिती द्यावी.

नगरसचिव : मा.डॉ.पी.एस.पसरीचा, अतिरिक्त पोलिस महासंचालक, (प्रशासन) महाराष्ट्र राज्य मुंबई त्यांचा दिनांक ०२/०८/२००३ रोजीचा क्रांतीचौक ते पैठणगेट या १०० फुट रूंद विकास योजना रस्त्याबाबतचा अहवाल (रिपार्ट) मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेशाप्रमाणे दिनांक १९/०९/२००३ रोजीच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यांत आला असता ठराव क्रमांक १४९/७ अन्वये '' प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.पी.एस.पसरीचा यांनी दिलेला अहवाल नामंजुर करून

ठराव रद्द करण्यांस मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.'' असा निर्णय झालेला आहे. सभा कामकाजासंबंधी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि 'ड' प्रकरण-२ चे नियम क्र.१ (ओ) व १(पी) चे मा.न्यायालयाने अवलोकन करून सदर प्रस्ताव पारीत करतांना मतदान न घेताच पारीत करण्यांत आले. सदर ठराव हा ठराव नसुन केवळ महापौरांनी केलेली घोषणा आहे. जर ठराव पारित झाला तर त्यावर मतदान होवुन तो एकमताने किंवा बहुमताने पारित झाल्याचे दिसणे आवश्यक आहे. सदर ठरावासंबंधी महापौरांनी केलेली घोषणा ही नियमातील तरतुदीशी विसंगत असुन सभा कामकाज नियमावलीचे विरूध्द असल्याबाबत दिनांक ०३/०३/२००४ रोजी दिलेल्या आदेशात नमुद केले आहे.

दिनांक ०१/१०/२००३ रोजी सुनावणीच्या वेळी महापालिका आयुक्त मा.न्यायालयात हजर होते, त्यावेळी मा.न्यायालयाने सांगीतले की, डॉ.पी.एस.पसरीचा यांचा अहवाल सभागृहापुढे परत ठेवण्यांत यावा. या संदर्भात मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी '' मा.उच्च न्यायालयाच्या ह्या प्रकरणी दिनांक ०१/१०/२००३ रोजी झालेल्या सुनावणी नुसार हा प्रस्ताव सभागृहात परत मांडून त्यावर निर्णय घेणे उचित व योग्य ठरेल'' अशी दिनांक ०९/१०/२००३ रोजी टिप्पणीसह संचिका दिनांक १०/१०/२००३ रोजी मा.महापौर यांचेकडे पाठविली असता तत्कालीन महापौर यांनी '' या विषयी दिनांक १९/०९/२००३ च्या सर्वसाधारण सभेत निर्णय झालेला आहे. त्यामुळे हा विषय पुन्हा सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची आवश्यकता वाटत नाही.'' असा दिनांक १०/१०/२००३ रोजी अभिप्राय दिलेला आहे. या अभिप्राया बाबतीत मा.न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. मा.न्यायालयाने दिनांक ०३/०३/२००४ रोजी आदेश दिलेले आहे की, आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी माहे एप्रिल २००४ च्या पहिल्या आठवड्यात महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा आयोजीत करण्यासंबंधी कार्यवाही करून डॉ.पी.एस.पसरीचा यांचा अहवाल (रिपोर्ट) सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा. या अहवालावर चर्चा होऊन सर्वसाधारण सभेत मतदानासाठी ठेवण्यात यावा व ठराव एकमताने किंवा बहुमताने पारित व्हावा व मा.न्यायालयास तातडीने कळविण्यात यावे असे आदेशित केले असुन सुनावणीची तारीख १२/०४/२००४ ठेवलेली होती. त्याप्रमाणे दिनांक ०६/०४/२००४ रोजी सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी गणपुर्ती अभावी सभा तहकुब झाली नंतरची तहकुब सभा दिनांक १०.०४.२००४ रोजी आयोजित करण्यात आली होती. उक्त सर्वसाधारण सभेत चर्चा होवून चर्चेनुसार सध्या लोकसभा निवडणूक सुरू आहे. त्यामुळे प्रकरणात वेळ वाढवून घेणे बाबत मा.उच्च न्यायालयास विनंती करावी असे सर्वानुमते प्रस्ताव मंजूर करण्यात आला. सदर मंजूर प्रस्ताव मा.उच्च न्यायालयास दिनांक १२.०४.२००४ रोजी सादर केले असता मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०३.०५.२००४ रोजी सर्वसाधारण सभा आयोजित करून सभेचा निर्णय दिनांक ०५.०५.२००४ रोजी सादर करणे बाबत मा.उच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत. सबब डॉ.पसरीचा यांचा अहवाल सर्वसाधारण सभेसमोर चर्चेसाठी आणि त्या वरील विधीवत निर्णय घेण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

श्री.संजय शिरसाट : मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये सभागृहात मत नोंदवावयाचे, मतदान करायचे, की चर्चा करायची.

नगर सचिव : सभागृहात चर्चा करून बहुमताने किंवा एकमताने निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : मला विनंती करावयाची आहे की, याबाबत चर्चा भरपुर झालेली आहे. या प्रस्तावावर मत नोंदवुन पास करावा असे मा.न्यायालयाने सांगीतले आहे. या ठिकाणी चर्चा न करता मतदान घ्यावे अशी विनंती आहे.

श्री.स.अली सलामी : डॉ.पसरिचा यांचा अहवाल हा क्रांतीचौक ते पैठणगेट पर्यंत आहे का, कि किलेअर्क पर्यंत आहे याचा खुलासा व्हावा.

मा. महापौर : सहाय्यक संचालक नगर रचना यांनी माहिती द्यावी.

स.संचालक न.र. : मा.डॉ.पसरिचा साहेबांचा जो रिपोर्ट आहे तो क्रांतीचौक ते किलेअर्क पर्यंतचा आहे.

श्री.स.अली सलामी : संबंधीत अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे डॉ.पसरिचा यांचा अहवाल हा क्रांतीचौक ते किलेअर्क असा आहे. पैठणगेट पर्यंत नाही. यामध्ये क्रांतीचौक ते पैठणगेट ७० फुट रूंद करावे. पैठणगेट ते किलेअर्क ५० फुट आहे. डॉ.पसरीचा यांच्या अहवालात पैठण गेट पर्यंत ७० फुट दाखविले, पुढे विकास योजनेत ५० फुट असुन ५० फुटा ऐवजी ४० फुटावर परवानगी दिलेली आहे. त्या लोकांवर टांगती तलवार राहील. त्यास ही ४० फुट करता येवु शकेल. ती दुरूस्ती करून सदरील प्रस्ताव मंजुर करावा हा प्रश्न मंदीर मस्जिदचा नाही शहराच्या शांतीच्या आहे. एकमताने पास करावा. पैठणगेट ते किलेअर्क हा मंजूर विकास योजनेचा रस्ता ५० फुटी ऐवजी ४० फुटी करून क्रांतीचौक ते पैठणगेट रस्ता ७० फुटी करून सर्वानुमते डॉ.पसरीचा यांचा अहवाल मंजूर करावा.

श्री.तकी हसन खान : मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार आणि डॉ.पसरिचा जे शासनाचे उच्चपदस्थ अधिकारी आहेत, त्यांचा अहवाल क्रांतीचौक ते किलेअर्क पर्यंतचा आहे हे स्पष्ट झाले आहे. आम्ही जी रंगारगल्ली रस्त्याला ४० फुटाची मंजुरी दिली, डॉ.पसरीचा यांच्या अहवालास मंजुरी दिली नाही तर ४० फुट दुरूस्ती रद्द समजण्यात यावे. आमची ही सर्वसाधारण सभा दोन-दोन निर्णय देत आहे. एक निर्णय जफर सैफुल्ला चा अहवाल तो आम्ही मा.न्यायालयावर सोपवितो. जो निर्णय मा.न्यायालय घेईल ते मान्य राहील. त्यावेळी ७० फुटावर आम्ही तयार होतो. नंतर दुसरा रिपोर्ट आला तर आम्ही विरोध करायला लागलो. तसे सांगण्यात आले. हा शहराच्या शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न आहे. एकतर आपण ४० फुट केले आहे. या सभेत जर डॉ.पसरीचा यांचा रिपोर्ट मान्य केला नाही तर हे आपणांस निर्णय घ्यावे लागेल की, ५० फुट करावे लागेल. हा एक मस्जिदचा प्रश्न नाही. तीन मंदीरांचाही प्रश्न आहे. क्रांतीचौक ते पैठणगेट हा ७० फुट केला नाही तर तीन मंदीर बाधीत होतील. आमचे म्हणणे आहे की, मंदीर ही माझे व मस्जिद ही माझी. आपण कोणत्याही स्थळास हात न लावता काही मार्ग निघत असेल तर काढावे. व हा मार्ग डॉ.पसरीचा यांनी आपणांस दिला आहे. डॉ.पसरीचा यांनी जो अहवाल दिला आहे तो एक्सपर्ट म्हणुन दिलेला आहे. शहराचे वाहतुकीची बाब समोर ठेवुन केलेला आहे. ते मान्य करणे आपणांस आवश्यक आहे. तज्ञांचे अहवालास मान्य करणे आपणांस आवश्यक आहे. तीन मंदीर व एक मस्जिद आमच्या हाताने तुटू नये. व ४० फुट रस्ता केला त्याला पुन्हा ५० फुट करता येवु नये.

श्री.अविनाश कुमावत : या ठिकाणी मी असा उल्लेख करू इच्छितो की, जो शहरासाठी आराखडा तयार केला आहे. तो ५० वर्षानंतर कसा राहील. राहीला मंदीर, मस्जिदचा प्रश्न. शहराच्या विकासात मंदीर येवो की, मस्जिद येवो ती हलविली गेली पाहिजे. १९९१ साली संतोषी माताचे मंदीर सिल्लेखाना ते मोंढा रस्त्यात येत होते. आम्ही स्वत: ते स्थलांतर केले. हे याठिकाणी उदाहरण आहे. शहराच्या विकासात मंदीर मस्जिद आले तर ती स्थलांतर करायला पाहिजे अशी मी याठिकाणी सभागृहाला विनंती करतो.

सौ.निखत परवीन एजाज : शहराचे वातावरण चांगले राहावे यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. आज आपण येथे महापौर आहात. कोणत्याही पक्षाचे नाही. शहराचे प्रथम नागरीक आहात. आपण याबाबतीत विचार करावा. रस्त्याच्या संदर्भात कायदा आहे. त्या प्रमाणे रस्ता व्हावा.

**ALIGNMENT OF ROAD**

( i ) The alignment should, as far as possible, avoid garden and bagayat lands / wells. The alignment should also avoid village gaothan, parmanant structures, electrical / telephone polls, etc. Mutilation of exiting survey numbers should also be avoided, if possible. This will avoid future difficulties in acquisition of land.

( j ) The alignment should avoid mosques, temples, burial grounds, burning ghats, tombs, samadhis and such others which have religious and sentimental value. The Engineer-in-charge of the sub-division is expected to record a certificate in this respect (Refer Para. 4.2.c).

स्टडी सर्वे ऑफ रोड मॅप हे दाखविते की, याप्रमाणे रस्ता विकसीत करता येईल. याप्रमाणे आपण रस्त्याला वळण देवु शकता. हे ऐतिहासीक शहर आहे व वाहतुकीचे मोठे तज्ञ जे जगातील चवथ्या क्रमांकाचे व्यक्ती आहे ते सांगतात की, हे बरोबर आहे. ते आपण मान्य करायला पाहिजे. आपण शहराचे वातावरण सरळ व शांत ठेवुन हे मान्य करावे. याची प्रत मी देत आहे.

श्रीमती पार्वती मानकापे : पुर्ण भारतात आपले शहर तिसऱ्या क्रमांकावर येते. मंदीर असो की, मस्जिद असो आपणांस विकास करायला काहीही हरकत नसावी. रोकडीया हनुमान कॉलनी वरील कोपऱ्यावरचे मंदीराचे स्थलांतर केलेले आहे. मग मस्जिद हलवायला काय हरकत नाही. मंदीर असो की, मस्जिद असो विकास करण्यात यावा.

श्री. कदीर मौलाना : आताच मा.सभागृहनेत्यांनी सांगीतले की, सभागृहात चर्चा व्हायला नको व ठराव मंजुर करावा. हा असा प्रश्न आहे ज्यात शहराचे हित आहे. शहराचे सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न आहे. नागरीकांचा यात प्रश्न आहे. त्यामुळे या विषयावर पुर्णत: सभागृहात चर्चा व्हावयास हवी सर्व सभागृहाचे मत त्यात यावयास पाहिजे. मा.न्यायालयाने जे आदेश दिले त्याचे पालन व्हावे. त्याप्रमाणे येथे निर्णय होवुन न्यायालयात जावयास पाहिजे. एका स.सदस्यांनी सांगीतले की, आराखडा बदलला जात नाही. मी सांगु इच्छितो की, रंगारगल्ली हा १५ मीटर असतांना १२ मीटर कसे केले व १२ मीटरवर कशी परवानगी दिली. जेथे तुमच्या स्वार्थाचा व राजकारणाचा प्रश्न येतो तेथे नियम बाजुला ठेवुन बोलण्यात येते. हे सभागृहाचे दुटप्पी धोरण आहे. आम्हा सर्वांना नुकसान देणारे आहे. सभागृहाचा जो नेता असतो तो महापौर असतो त्यांनी परिस्थितीला पाहुन योग्य प्रकारचा निर्णय घ्यायला हवा. क्रांतीचौक ते किलेअर्क पर्यंत डॉ.पसरीचा यांचाअहवाल आहे. हे स्पष्ट करते की, क्रांतीचौक ते किलेअर्क पर्यंत एक मस्जिद व तीन मंदीर यात येतात. आज मंदीर, मस्जिदच्या नावावर राजकारण आमच्या जवळ नसावे. आपण शहराचे जबाबदार नागरीक व आपणांस जनतेने जनहितासाठी येथे पाठविले आहे. या सभागृहाचा जो हक्क आहे तो नियमान्वये होणे त्याचा वापर करणे आपला अधिकार आहे. आम्ही विसरलो व लोकांवर लादण्याचे काम केले. सभागृहात आपण हे अधिकारही विसरलो आहोत. हे जनतेसाठी नुकसान देणारे ठरू शकते. माझी विनंती आहे की, मा.महापौरांनी याठिकाणी पहावे की, येथे मंदीरचा मुद्दा आहे. डॉ.पसरीचा चे अहवाल पाहाता आपण निर्णय घ्याया व मा.न्यायालयास पाठवावे. त्यामुळे येथील एका मस्जिदचा वाद संपेल व तीन मंदीरे जे तुटण्याच्या मार्गावर आहेत ते राहु शकतील. शहराची शांतताही राहील. येथे जो राजकारण करण्याचे वातावरण आहे ते सभागृहात संपले पाहिजे. सुंदर व

स्वच्छ वातावरण निर्माण झाले पाहिजे. लोकांसाठी सुखशांती व सुव्यवस्थेचे वातावरण येथे निर्माण झाले पाहिजे. ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

श्री. सुरजीतसिंग खुंगर : डॉ. पसरिचा यांचा जो अहवाल आहे यामुद्द्यावर तरी कोणी राजकारण करू नये. त्यांनी तांत्रिकदृष्ट्या चांगला अभ्यास करून तयार केला आहे. माझी विनंती आहे की, अहवाल मान्य करावा. शहराची शांती व बंधुभाव आहे. सर्व राजकीय पक्ष आपल्या सोबत ठेवु इच्छिते. सर्व संमतीने मान्य करावा.

श्री. अविनाश कुमावत : याठिकाणी जो तो शांती-अमन ची भाषा करतो. याठिकाणी एक मस्जिद जाते आमचे तीन मंदीर जातात. आम्ही बोलत नाही. काय भाषा चालली आहे. शांती-अमन करत बसता. (याचवेळी बरेच सदस्य बोलतात. गोंधळ होतो.)

मा. महापौर : प्रत्येक सदस्याने आपले मत दोन-दोन मिनिटांत मांडावे.

श्री. संजय शिरसाट : चर्चेला सुरूवात करण्यापुर्वी खुलासा करण्यात यावा की, या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय काय आहे. त्याबाबतची माहीती द्यावी. त्याचप्रमाणे क्रांतीचौक ते पैठणगेट येथील मंजूर विकास योजने बाबतचा रस्त्यातील बाधीत होणाऱ्या नागरीकांना आपण नुकसान भरपाई दिलेली आहे काय?

श्री. भगवान रगडे : विषयांतर करू नका चर्चा करून निर्णय घ्यावा. आपल्याकडे डॉ. पसरिचा जे की,

श्री.अफसरखान : शासनाचे प्रतिनिधी आहेत त्यांनी अहवाल दिलेला आहे त्यानुसार सभागृहात चर्चा करून निर्णय घ्यावयाचा आहे. बाकी इतर बाबींवर चर्चा करणे योग्य नाही. बाकीच्या निर्णयाशी काही घेणे नाही.

श्री. संजय शिरसाट : मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सभा बोलाविण्यात आलेली आहे. चर्चा करावी. मा.उच्च न्यायालयाचे अभिनंदन करावे. गेल्या दिड वर्षापासुन या अहवालावर कार्यवाही चालु आहे. कोणीतरी दिल्लीचा माणुस आला त्यानी तीन महिने आजाराचे कारण दाखवुन तब्बेत ठिक नाही म्हणुन सांगीतले. त्यांनी अहवाल मा.उच्च न्यायालयात सादर केला. मा.उच्च न्यायालयाचे समाधान झाले नाही म्हणुन डॉ.रफीक झकेरिया जे या शहराचे रहीवाशी आहेत त्यांना मा.उच्च न्यायालयाने सांगीतले आपले मत नोंदवावे. त्यांनी दोन-तीन महिने घेतले व सांगीतले की, मी टेक्नीकल माणुस नाही, मला मत मांडता येणार नाही. नंतर डॉ.पसरीचा यांना सांगण्यात आले की, त्यांनी अहवाल सादर करावा. ते काही फार तज्ञ आहे असे नाही. महानगरपालिकेने एक छोटेसे बेट तयार करायचे होते. कोकणवाडी येथे डॉ.पसरिचा यांच्या मार्गदर्शनाखाली बेट तयार झाले. लोकांना कोणत्या बाजुने जावे हे देखील कळत नव्हते.

श्री. अफसरखान : सभागृहात विषयांतर न करता केवळ डॉ. पसरिचा यांच्या अहवालावरच चर्चा करून निर्णय घेण्यात यावा. काम झाले, काम झाले नाही याचेशी काही देणे घेणे नाही.

श्री संजय शिरसाट :मी माझे मत या ठिकाणी मांडणार आहे. शहराच्या विकास कामाबद्दल मला माझे मत मांडावयाचे आहे. माझे मत मा.उच्च न्यायालयात जाणार आहे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : एकावेळी एकाने बोलावे.

श्री.अफसरखान : शहराच्या विकास कामाबाबत चर्चा करीत असतांना आजच्या विषय पत्रिकांवर जो विषय आहे त्यावरच चर्चा व्हावी. त्यानुसारच मान्य आहे किंवा अमान्य ऐवढेच मांडावे.

श्री.संजय शिरसाट : गंभीर विषय आहे. मस्जिद-मंदीराचे राजकारण करू नये. मी मंदीर-मस्जिदचा प्रश्न काढत नाही. शहरात काय घडले ते सांगतो.

श्री.मीर हिदायत अली : डॉ.पसरिचा यांचा अहवाल मान्य की अमान्य यावरच बोलावे.

मा.महापौर : प्रत्येकांना दोन-दोन मिनिटे दिले जातील त्यांनी बोलावे.

श्री.संजय शिरसाट : सभागृहात प्रत्येकांनी आपआपले मत काय ते मांडावे. मी डॉ.पसरिचा यांचे बद्दल बोललो. महानगरपालिकेने सर्व प्रथम विकास योजना सादर केली व शासनाकडुन मंजुर होवुन आली. त्यात १०० फुट रस्ता आहे. मी मंदीर-मस्जिद बद्दल बोलत नाही. शहराच्या विकासासंदर्भात बोलतो. मा.उच्च न्यायालयाने सांगीतले की, सभागृहात तुमचे मत काय आहे ते मांडा. परंतु डॉ.पसरिचा यांनी केलेल्या चुकाही दाखवाव्या लागतील. १०-२० वर्षानंतर या शहराचे काय होणार ? हा रस्ता पैठण गेट व पुढे किलेअर्क पर्यंत असेल तर तीन मंदीरे जाणार एक नगरसेवक म्हणुन मत व्यक्त करतो. मंदीर-मस्जिदशी काहीही देणेघेणे नाही. शहरातील नागरीकांना व्यवस्थीत चालता आले पाहिजे. संध्याकाळी गुलमंडीवर माणसांला चालता येत नाही. १०० फुट झाला तर वाहतुक सुरळीत होईल. मा.उच्च न्यायालयाने सांगीतले आपले मत मांडा. रस्त्यातील मंदीरे आम्ही आमच्या हाताने स्थलांतर केले.

श्री. अफसरखान : आम्हाला आपल्या मताशी काहीही घेणे नाही. प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.पसरीचा यांनी जो अहवाल दिलेला आहे त्यावर चर्चा करून निर्णय व्हावा असे आम्हाला वाटते.

श्री.संजय शिरसाट : हा रस्ता १०० फुट करावा. अहवाल फेटाळावा. मंदीर-मस्जिदचा प्रश्न काढु नये.

(याचवेळी काही स.सदस्य मा.महापौर यांचे आसनासमोर जातात व जोरजोरात बोलतात. काहीही ऐकू येत नाही.)

मा.महापौर : सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसुन घ्यावे.

श्री. नासिरखान कुरैशी : यापुर्वीही चर्चा झालेली आहे. डॉ.पसरिचा यांचा अहवाल मंजुर आहे किंवा नाही याबाबतचा निर्णय घ्यावयाचा आहे. क्रांतीचौकापासुन पुढे ७० फुट मंजुर करण्यास काय हरकत आहे. एकमताने ७० फुट मंजुर करावा. पुढे जावुन १०० फुट आहे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : या अगोदर मी सुचना केलेली होती की, प्रस्तावावर चर्चा न करता मतदान घ्यावे. परंतु सर्वांना चर्चा करू द्यावी. चर्चा करून पुरावे द्यावे.

श्री. अफसरखान : प्रस्तावातील विषयावरच चर्चा व्हावी. विषयांतर होऊ नये.

श्री. संजय शिरसाट : सभागृहात मी एक नागरीक, लोकप्रतिनिधी म्हणुन माझे मत मांडत आहे. बरोबर आहे की, चुक आहे हे ठरवायचा अधिकार त्यांना नाही.

मा.महापौर : सर्व स.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसावे.

श्री. प्रशांत देसरडा : गेल्या तीन सभांपासुन या अहवालावर चर्चा होत आहे. मागच्या दोन मिटींग अगोदर आपण सविस्तर चर्चा केली होती. त्यावेळी मी माझे मत मांडले होते. ते इतिवृत्तात आले नाही याचा मला खेद आहे. डॉ.पसरिचा यांना बोलावले होते.

श्री.संजय शिरसाट : मला माझे मत मांडतांना अडथळा झालेला आहे. मला माझे मत नोंदवावयाचे आहे. हे मा.उच्च न्यायालयाकडे जाणार आहे. मला दोन मुद्दे मांडावयाचे आहेत. डॉ.पसरिचा यांनी १०० फुटी रूंद रस्त्याचा अहवाल तयार करीत असतांना महानगरपालिकेतील सहाय्यक संचालक नगररचना किंवा जिल्हा नगररचना विभागाचे मत घेतलेले आहे काय ? कशाच्या आधारावर हा अहवाल केला आणि हा जो अहवाल तयार केला तो एका जागी बसुन तयार केलेला आहे तो आम्हाला मान्य नाही.

श्री.जयंवत ओक : या शहराच्या अत्यंत जिव्हाळ्याचा, विकासाचा, मंदीर-मस्जिद बाबतीत मुद्दा निघालेला आहे. सुरूवातीला विरोधी पक्षाकडुन सुरूवात झाली. बोलायला संधी दिली. आपणांस विनंती की, सभागृहात वार्ड क्र.१ ते ८३ अशा सर्व स.सदस्यांना विकास कामातील प्रश्नावर चर्चा करण्याची वेळ द्यावी व त्यांना सर्व अधिकार आहे. त्यानुसार सर्वांना बोलू द्यावे. वार्ड क्र. १ ते ८३ ज्यांना-ज्यांना मत व्यक्त करायचे

आहे. त्यांना मत व्यक्त करू द्यावे. चर्चा होवु द्या. जे मध्ये अडथळा आणतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.अफसरखान : वार्ड निहाय वार्ड क्र.१ ते ८३ च्या सर्व स.सदस्यांना बोलण्याचा अधिकार आहे. परंतु त्यांनी डॉ.पसरीचा यांचा जो अहवाल दिलेला आहे. त्या अहवालावर चर्चा करून मा.न्यायालयात निर्णय सादर करावयाचा आहे. त्यानुसार फक्त डॉ.पसरीचा यांच्या अहवालावर चर्चा करून निर्णय कळवावा.

श्री. प्रशांत देसरडा : मागच्या वेळेस मी माझे मत मांडले होते ते इतिवृत्तांतात आले नाही. डॉ.पसरीचा यांनी क्रांतीचौक ते पैठणगेट रस्त्याच्या १०० फुटी रोड बाबत आपला अहवाल सादर केला. मुद्दा उपस्थित झाला तो क्रांतीचौक ते किलेअर्क पर्यंत आहे का? त्यांनी जे त्यात त्यांचे मत दिले ते फक्त मी किती वाजता सुभेदारीला आलो, किती वाजता औरंगाबादला आलो आणि किती वाजता क्रांतीचौकला आलो. एवढेच मत त्यांनी त्यात दिलेले आहे. कारण मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्णयानुसार क्रांतीचौक ते पैठणगेट या रस्त्याबाबत १०० फुटी विकास योजनेअंतर्गत रस्ता व्हावा असे असतांना महाराष्ट्र शासनाने या क्रांतीचौक रस्त्यापासुन १०० फुटी रस्त्याऐवजी ७० फुट करून साईटला ३० फुट केले. त्यावेळेस महाराष्ट्र शासनाने आदेशाचे विचार केला का, हा विचार केला नसला तरी ज्या वेळेस नगररचना विभागाकडे सुचना व हरकती मागविल्या त्यावेळी आम्ही भारतीय जनता पार्टीचे १६ नगरसेवक व शहरातील ३५० लोकांनी हरकती दाखल केल्या. महाराष्ट्र शासनाने मताचे राजकारण करून आम्ही घेतलेल्या आक्षेपाचे आम्हाला उत्तर सुध्दा दिलेले नाही. संबंधीत मा.उच्च न्यायालयाने जेवढे महानगरपालिकेकडे दिले तेवढे लक्ष जर महाराष्ट्र शासनाकडे दिले असते तर महाराष्ट्र शासनाची चुक आपल्याला लाभली व हा वाद निर्माण करण्याचे काम महाराष्ट्र सरकारने केले तो वाद झाला नसता. महाराष्ट्र शासनाचे भुमिकेमुळे आपण संभ्रमात आहे. त्यामुळे संबंधीत मा.उच्च न्यायालयाला माझी विनंती आहे, माझ्या अहवालात तसे नमुद करा की, तुम्ही शासनाला सांगायचे की, ज्या नगरसेवकांनी हरकती घेतल्या होत्या त्याहरकतीचे उत्तर तयार करा. माझे स्वत:चे मत असे आहे की, डॉ.पसरिचा यांना पाठविण्यामध्ये काहीतरी षडयंत्र आहे. त्यांनी दिलेला अहवाल फेटाळावा.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : प्रत्येकाला एक-एक करून बोलायची संधी द्या. वार्ड १ पासुन सुरूवात करावी.

श्री.भगवान रगडे : क्रांतीचौक ते पैठणगेट हा १०० फुटी रस्ता आहे. त्यामध्ये मस्जिद जवळुन ७० फुट रस्त्यास डॉ.पसरीचा यांच्या अहवालावरून प्रशासनाने विषय ठेवलेला आहे. तो मान्य करावा कारण या शहरातील शांतता भंग होणार नाही. सामंजस्याने व चर्चा करूनच प्रस्तावावर निर्णय घेऊन मान्य व्हावा.

श्री.जयवंत ओक : इतिवृत्तांतातील हा विषय एखाद्या मंदीर/मस्जिदचा विषय नसुन शहरातील विकास कामासाठीचा विषय आहे. एखादा सुज्ञ नागरीक म्हणुन शहरातील विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यापुर्वी सभागृहनेता यांनी आमच्याकडुन विरोधी पक्ष नेता यांनी विरोधकांकडुन बोलले. प्रत्येकास बोलु द्यावे. मा.उच्च न्यायालयाने सांगीतले सर्व सदस्य बोलले नाही. सभागृह नेता व विरोधी पक्ष नेता यांचे सर्वांतर्फे मत आहे. मा.न्यायालयाने मान्य केले नाही. सर्वांना मत व्यक्त करू द्यावे. नंतर मतदानास टाकावे.

श्री.भगवान घडमोडे : हा प्रश्न म्हणजे मंदीर-मस्जिदचा विषय नाही. विकासाचा आहे. या शहराची भौगोलिक रचना ऐतिहासीक दृष्टीकोन पाहता हा रस्ता आवश्यक वाटतो. आपल्या शहराचे मार्केट शहराच्या बाहेर जात आहे. हा रस्ता १०० फुट असावयास पाहिजे. या विषयाला मंदीर-मस्जिदचा रंग दिला तर कोणीही माफ करणार नाही. १००

फुटाचा ७० फुट केला तर भविष्याचा विचार केला पाहिजे. आपण असु नसू आपण सुज्ञ नागरीक असाल तर विचार करायला पाहिजे. रस्ता कसा असावा. स्कुटर चालवायला अडचण होते कोणीही सांगु शकतो. डॉ.पसरिचा यांचा अहवाल फेटाळावा. अशी विनंती करतो.

डॉ.भागवत कराड : डॉ.पसरिचा यांचा अहवाल मान्य करावा किंवा फेटाळावा यावर ही सभा आयोजीत केलेली आहे. या विषयावर दोन वेळेस सभा लावली. परत आज सुध्दा तोच विषय आहे. मला सर्व सदस्यांना विनंती करायची आहे. हा विषय शहराच्या विकासाच्या दृष्टीने घ्यावा. यात राजकारण आणू नये. व शहराचा विकास करण्यासाठी किंवा शहरात मोठे रस्ते असावे म्हणुन डॉ.पसरिचा यांचा अहवाल फेटाळण्यात यावा अशी मी आपणांस विनंती करतो.

मा.महापौर : या विषयावर आता खुपच चर्चा झालेली आहे. आता मतदान घेण्यात येत आहे. नगरसचिवांनी नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

नगरसचिव : **सर्वसाधारण सभेत प्रस्तावावर मतदानाद्वारे निर्णय घेण्याबाबतच्या तरतुदी –**

**अ ) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची 'ड' प्रकरण–२ खालील महानगरपालिकेचे कामकाजाबाबत असलेल्या नियमातील तरतुदी–**

**नियम क्र.१ (ओ) :** एखाद्या, सभेपुढे नोटीस न देता तातडीचे कामकाज आणण्यात स्थायी समितीस, परिवहन समितीस किंवा आयुक्तास परवानगी द्यावी किंवा कसे या प्रश्ना व्यतिरिक्त अन्य प्रत्येक प्रश्नावर, या अधिनियमात किंवा त्या अन्वये अन्यथा तरतुद करण्यात आली नसेल तर, सभेत उपस्थित असलेल्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या पालिका सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेण्यात आला पाहिजे, आणि समसमान मते पडतील तेव्हा अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल.

**नियम क्र.१ (प) :** एखादा प्रस्ताव पारित झाला आहे अशी अध्यक्ष स्थानी असलेल्या प्राधिकाऱ्याने केलेली घोषणा आणि कार्यवृत्त पुस्तकात तशा अर्थाची केलेली नोंद ही अशा घोषणेच्या वेळी कमीत कमी चार पालिका सदस्यांनी मतदानाची मागणी केली नाही तर, त्या वस्तुस्थितीचा निर्णायक पुरावा असेल; मग अशा प्रस्तावाच्या बाजुने किंवा प्रस्तावाच्या विरूध्द देण्यात आलेल्या मतांची संख्या सिध्द करण्याची आवश्यकता असणार नाही;

**नियम क्र.१ (क्यु) :** मतदान घेण्यात येईल तेव्हा अध्यक्षस्थानी असलेल्या प्राधीकाऱ्याने नेमलेल्या गणकांनी उपस्थित असलेल्या व प्रस्तावावर मतदान करणाऱ्या प्रत्येक पालिका सदस्यांचे मत घेतले पाहिजे आणि अनुक्रमे प्रस्तावाच्या बाजुने किंवा प्रस्तावाच्या विरूध्द मतदान करणाऱ्या पालिका सदस्यांची नांवे कार्यवृत्त पुस्तकात लिहिण्यात आली पाहिजेत;

**ब ) औरंगाबाद महानगरपालिकेचे व समित्यांचे कामकाजासंबंधी जादा नियमातील मतदानासंबंधीच्या तरतुदी –**

**नियम क्र.३५ :** लेखी मतमोजणी कशी घ्यावी आणि गणकाची कर्तव्ये.

ज्यावेळी लेखी मतमोजणी करण्यात येईल त्यावेळी सभापती प्रस्तावाला अनुकूल असतील त्याचा आणि प्रतिकुल असतील त्याचा असे दोन गट करण्यास सांगतील.

सभागृहाच्या टोकाला असलेल्या दोन कोपऱ्यात दोन मेजे कायमची ठेवण्यात यावीत. लेखी मतमोजणीची मागणी करण्यात आल्याबरोबर नगरसचिव यांनी प्रत्येक मेजावर सभासदांची यादी ठेवावी. सभासदांनी तेथे जावुन आपआपल्या नावापुढे सभापतींनी नेमलेल्या गणकासमक्ष आपल्या नावांची अद्याक्षरे करावीत. मेजावर 'होय' आणि 'नाही' या लिखाणाचे फलक लावण्यात येतील. उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या प्रत्येक सभासदाचे मत गणक वर सांगीतल्याप्रमाणे घेतील आणि प्रस्तावाला अनुकूल वा प्रतिकूल असलेल्या सभासदांनी त्याप्रमाणे तटस्थ राहणाऱ्या सभासदांची नांवे वृत्तांत पुस्तिकेत नोंदली जातील. समसमान मते पडली तर सभापती निर्णायक मत देतील.

नामनिर्देशित पालिका सदस्यांना मतदानात भाग घेता येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी. मा.पिठासीन अधिकारी यांना विनंती की, त्यांनी एक 'होय' व दुसरे 'नाही' असे लिहिलेल्या टेबला जवळ दोन गणकांची नियुक्ती करावी.

मा.महापौर : नियमाप्रमाणे दोन बाजुने लेखी मतनोंदणीची व्यवस्था करणेत आलेली आहे. माझ्या डाव्या बाजुस करमुल्य निर्धारण अधिकारी व उजव्या बाजुस उपआयुक्त (प्रशासन) यांनी गणक म्हणुन काम पाहावे.

नगरसचिव : ज्यांना प्रस्तावाच्या बाजुने मत नोंदवायचे असेल त्यांनी माझ्या डाव्या बाजुला "होय" याठिकाणी व ज्यांना प्रस्तावाच्या विरोधात मत नोंदवायचे असेल त्यांनी माझ्या उजव्या बाजुला "नाही" या फलकाच्या ठिकाणी ठेवलेल्या पालिका सदस्यांच्या यादीतील आपल्या नावासमोर गणकासमक्ष अद्याक्षरी करावी.

(याचवेळी डाव्या व उजव्या बाजुने एकाच वेळी लेखी मतनोंदणीची प्रक्रिया सुरू होते.)

मा.महापौर : आता लेखी मतनोंदणीची प्रक्रिया संपलेली आहे.

प्रस्तावाच्या बाजुने - ३० मते

प्रस्तावाच्या विरोधात - ४१ मते

अशा रितीने ४१ विरूध्द ३० बहुमतांने अहवाल फेटाळण्यात येतो.

| **प्रस्तावास अनुकुल मते (प्रस्तावाच्या बाजुने)** | | **प्रस्तावास प्रतिकुल मते(प्रस्तावाच्या विरोधात)** | |
|---|---|---|---|
| अ.क्र | स.पालिका सदस्याचे नांव | अ.क्र | स.पालिका सदस्याचे नांव |
| ०१ | श्री.तांबे गणेश रामचंद्र | ०१ | श्री. वाणी ठकुजी रामसिंग |
| ०२ | सौ.साजेदा बेगम विखार अहमद | ०२ | श्री. शिंदे राजु रामराव |
| ०३ | श्री.शेख इलियास किरमाणी शे. उमर | ०३ | श्री. कावडे साहेबराव राणुबा |
| ०४ | श्री.औताडे रावसाहेब ममतु | ०४ | श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव |
| ०५ | श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी | ०५ | सौ. पवार मंदाबाई प्रभाकर |
| ०६ | श्री.रगडे भगवान दगडूजी | ०६ | सौ.शिंदे रूख्मिणी राधाकिशन |
| ०७ | श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ | ०७ | श्रीमती किवळेकर जयश्री सारंग |
| ०८ | श्री.नजर हमीद अब्दुल गफुर | ०८ | सौ.लोखंडे कचराबाई उत्तमराव |
| ०९ | श्री.शिंदे किशोर रावसाहेब | ०९ | श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव |
| १० | श्री.अब्दुल कादर अ. हफीज | १० | डॉ. बिनवडे आशा उत्तम |
| ११ | श्री.मो. जावेद मो. इसाक | ११ | श्रीमती मानकापे पार्वतीबाई लहानु |

| | | | |
|---|---|---|---|
| १२ | सौ. खरात कुसूमबाई दौलत | १२ | श्री. कुमावत अविनाश लक्ष्मण |
| १३ | सौ.नुसरत बानो फिरोज खान | १३ | सौ. सुरडकर साधना गणेश |
| १४ | श्री.तायडे पांडूरंग यशवंतराव | १४ | सौ.रहाटकर विजया किशोर |
| १५ | श्री.अ.कदीर मौलाना सय्यद | १५ | श्री. सावंत मधुकर दामोधर |
| १६ | श्री.अशरफ मोतीवाला | १६ | सौ.चंद्रात्रे सुवर्णा उमेश |
| १७ | श्री.नासीरखान अब्दुल रहेमान खान कुरेशी | १७ | श्री. घोडेले नंदकुमार राधाकिसन |
| १८ | श्रीमती शाहीन जफर महमुद जफर | १८ | श्री. जैन विकास रतनलाल |
| १९ | श्री.स. सलीम स. युसुफ | १९ | सौ. कांबळे निर्मला विठ्ठल |
| २० | श्री.तकी हसनखान कासीम हसन खान | २० | श्री. शिरसाट संजय पांडूरंग |
| २१ | श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद | २१ | डॉ. कराड भागवत किशनराव |
| २२ | श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली | २२ | श्री. तांदुळवाडीकर आनंद विनायकराव |
| २३ | सौ.सिद्दीकी नईम सुलताना सिद्दीकी | २३ | श्री. मेघावाले मोहन धन्नुलाल |
| २४ | श्री.अजिजखान गणी खान | २४ | श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक |
| २५ | श्री.अफसरखान यासीन खान | २५ | सौ. मोरे जयश्री कुमारराव |
| २६ | सौ.सुलताना बेगम चॉंद खॉं | २६ | श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ |
| २७ | श्री.शेख मुनाफ शेख यासीन | २७ | श्री. फुल्लारी नंदकुमार माधवराव |
| २८ | श्री.कैसरखान बद्रोद्दीन खान | २८ | सौ. कुलकर्णी जयश्री विजय |
| २९ | श्री.स.अली सलामी स.मिरां सलामी | २९ | श्री. पारे सोपान भाऊराव |
| ३० | सौ. निखत परवीन एजाज अली | ३० | सौ. राजपुत विमलबाई भिकनसिंग |
| | | ३१ | श्री. देसरडा प्रशांत सुभाष |
| | | ३२ | सौ. जेजुरकर ताराबाई सुधाकर |
| | | ३३ | श्री. गायकवाड राधाकृष्ण राजाराम |
| | | ३४ | सौ. मैंद संगिता बाळू |
| | | ३५ | श्री. होलीये रणधीर अशोकसिंग |
| | | ३६ | श्री. जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण |
| | | ३७ | श्री. ओक जयवंत केशवराव |
| | | ३८ | श्री. लकडे भरत श्रीपती |
| | | ३९ | श्री. सिध्द जगदीश कन्हैयालाल |
| | | ४० | सौ. कागडा बबीता सुभाष |
| | | ४१ | श्री. तनवाणी किसनचंद लेखराज |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे क्रांतीचौक ते पैठणगेट या मंजूर विकास योजना ३० मीटर (१०० फुट) रूंद रस्त्याबाबत डॉ.पी.एस.पसरिचा, अतिरिक्त पोलीस महासंचालक(प्रशासन),महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रत्यक्ष स्थळ पाहणी अहवालावर सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावावर झालेल्या मतदानानुसार सदर अहवाल बहुमताने फेटाळण्यात आला. यास बहुमताने मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र.३१०/१ :**

दिनांक ०६.०४.२००४ आणि १०.०४.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.नंदकुमार घोडेले : विषय पत्रिकेवर विषय क्र.१ इतिवृत्त कायम करण्याचा विषय आहे, तो घेण्यात यावे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : इतिवृत्त कायम करण्यांत यावे.
श्री.अफ़सर खान : पुढच्या सभेत घेता येईल.
मा.महापौर : विषय क्र.१ मंजूर

**<u>ठराव :</u>**

दिनांक ०६.०४.२००४ आणि १०.०४.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत आली.

या बरोबरच ‘‘ जन गण मन ‘‘ या राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका,औरंगाबाद.